## प्रेस नोट ता. २५/१०/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

# व्यापा-याची १४ लाख रुपयांची लुटमार करणा-या आरोपींच्या मुसक्या आवळल्या

## ०३ गुन्हयात फरार असणारे ०२ सराईत आरोपींसह एकुण ०४ आरोपींना अटक

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

पिंपरीतील होलसेल कापड दुकानदार मोहनदास सिरुमल तेजवाणी वय ६२ वर्षे रा.विजयनगर काळेवाडी पुणे यांनी दिनांक १८/१०/२०२३ रोजी वाकड पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली की, दि.१८/१०/२०२३ रोजी सायं.१८.३० वा सुमारास ते दुकानातील रोख रक्कम १४ लाख रुपये घेवुन त्यांचेकडील अ‍ॅक्टीव्हा मोपेड वरुन घरी जात असताना बालाजी लॉन्स समोर काळेवाडी येथे दोन अनोळखी चोरटयांनी मोटार सायकलवरुन येवुन त्यांना धक्का देवुन गाडी वरुन खाली पाडुन त्यांचेकडील १४ लाख रुपये रोख रक्कम असलेली बॅग जबरीने चोरुन नेली आहे. वगैरे मजकुरचे फिर्यादीवरुन वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. १०२८/२०२३ भादंवि कलम ३९४,३४ अन्वये गुन्हा दाखल करणेत आला.

सदर घटनेचे गांभीर्य ओळखुन मा.श्री. गणेश जवादवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांना सोबतचे पोलीस अंमलदारांसोबत गुन्हयाचा तपास करुन तात्काळ आरोपी अटक करुन रक्कम हस्तगत करणेबाबत आदेश दिले.

त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण विभागातील अधिकारी व अंमलदार यांनी सिसीटीव्ही फुटेजचे आधारे तसेच बातमीदारांचे मार्फत चोरटयांचा शोध सुरु केला. गुन्हा करणेसाठी आरोपींनी एक शाईन मोटार सायकल वापरलेचे निष्पन्न झाले. सिसीटीव्ही फुटेज मधील संशयीतांबाबत बातमीदारांकडुन माहीती घेतली असता त्यांची नावे सुहास जोगदंड, आदित्य घायतडक अशी आहेत असे समजले. माहीती प्राप्त आरोपींचा माघ घेत त्यांना गुन्हा करणेसाठी वापरलेल्या मोटार सायकलसह काळेवाडी परीसरातुन ताब्यात घेतले असता त्यांची नावे १) सुहास नवनाथ जोगदंड वय २२ वर्षे रा.गिरजुबाबा मंदीरामागे, ११ नंबर बिल्डींग शेजारी, बौध्द्नगर, पिंपरी पुणे २) आदित्य संतोष घायतडक वय २१ वर्षे रा.१५ नंबर बिल्डींग शेजारी बौध्द्नगर पिंपरी पुणे अशी असल्याचे समजले. आरोपींचे ताब्यात गुन्हयात जबरी चोरी केलेल्या रक्कमेपैकी काही रक्कम मिळाली. त्यामुळे आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आली. आरोपींचेकडे केले तपासात त्यांनी सदरचा गुन्हा हा त्यांचे अजुन दोन साथीदार सह मिळुन कट कारस्थान रचुन केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे सदर गुन्हयात भादवि कलम १२०(ब) अशी कलमवाढ करण्यात आली आहे. अटक आरोपींना पोलीसांनी पकडल्याचे माहिती मिळाल्याने आरोपींचे दोन्ही साथीदार हे आपले फोन बंद करून फरार झाले होते. त्यांचेबाबत तांत्रिक व पांरपारिक तपास करत साथीदार दोन्ही आरोपी नामे १) अमन आजिम शेख वय २० वर्षे रा.आर्य समाज चौक, पुनम फर्निचर जवळ, रामकृष्ण नगर, पिंपरी पुणे २) गणेश भुंगा कांबळे वय २१ वर्षे रा. पाचपिर चौक, पंचनाथ कॉलनी, काळेवाडी पुणे मुळ रा. भाटनगर, रेल्वे लाईन जवळ, निराधारनगर, शंकराचे मंदीराचे बाजुला पिंपरी यांना गुन्हयात अटक करण्यात आली आहे. अटक ४ आरोपी यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करित गुन्हयात जबरी चोरी केलेली एकुण रोख रक्कम १०,४०,०००/- रुपये व गुन्हा करणेसाठी वापरलेली होंडा शाईन मो.सा.नं.एमएच.१४.जेएफ.२७५२ असा **एकुण ११,१०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करणेत आला आहे.**

आरोपींचे तपासादरम्यान माहीती मिळाली की, अमन आजिम शेख व गणेश भुंगा कांबळे हे १) **निगडी** पोलीस स्टेशन गु.रजि.नं.५९७/२०२३ भादविक ३७९ २) **सांगवी** पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ५३७/२०२३ भादविक ३७९ ३) **सांगवी** पोलीस स्टेशन गु.रजि.नं.५०२/२०२३ भादविक ३७९ या ०३ गुन्हयात फरार आहेत. तसेच गणेश कांबळे याचेवर यापुर्वी एकुण १० गुन्हे, अमन शेख याचेवर ०३ गुन्हे, व आदित्य घायतडक याचेवर ०१ गुन्हा दाखल आहे. अशा प्रकारे अटक आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन कट कारस्थान करुन त्यांनी केलेला गुन्हा वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाने उघड केला असुन चारही आरोपींना दि.२५/१०/२०२३ रोजी पर्यत पोलीस कोठडी प्राप्त आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२ पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड

यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री. विठ्ठल साळुंखे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोहवा.वंदु गिरे, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.सौदागर लामतुरे, पोशि.कौंतेय खराडे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड

**१) आरोपी नामे गणेश भुंगा कांबळे याचेवर दाखल गुन्हयांची माहीती खालील प्रमाणे**

| अ.नं | पो.स्टे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ३६१/२०१७ | भा.दं.वि.क ३०२,३४ |
| २ | पिंपरी | ६३/२०१९ | भा.द.वि कलम ३९२,३४ |
| ३ | पिंपरी | ३२६/२०१९ | भा.द.वि कलम ३७९ |
| ४ | पिंपरी | ५५२/२०१९ | भा.द.वि कलम ३७९ |
| ५ | पिंपरी | १११४/२०१९ | भादवि ३९२, ३४ |
| ६ | पिंपरी | ३७३/२०२० | भादवि ३९२,४२७,५०६,३४, आर्म ॲक्ट ४(२५) |
| ७ | चिखली | १७९/२०२० | भादवि ३७९ |
| ८ | पिंपरी | ५८०/२०२१ | भादवि ४५२,३२४,३२३,५०४,३४ |
| ९ | पिंपरी | ७८३/२०२१ | भा.द.वि १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,४२७ |
| १० | एमआयडीसी भोसरी | १२३/२०२२ | भादवि ३९७,३९५,५०६,आर्म ॲक्ट ४(२५)(२७) महापोका ३७(१)(३) सह १३५ |

**२) अमन आजीम शेख वय २० वर्षे, रा. गॅलार्ड चौकाजवळ, शास्त्रीनगर, पिंपरी पुणे**

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा.रजि.नं. | कलम. |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ५१७/२०२२ | भादविक ३०७, ३४१, ३३६, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७,१४८, १४९, ४२७ क्रिमीनल अमेंडमेंड ॲक्ट कलम ३ सह ७, भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ४(२५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) सह १३५ |
| २ | पिंपरी | २५८/२०२३ | भादवि १४३, १४७, १४८, १४९, ४२७, ५०४, ५०६, आर्म ॲक्ट ४(२५), क्रि.लॉ.ॲ.ॲ ३,७ महापोका३७(१)(३) सह १३५ |
| ३ | पिंपरी | ४०४/२०२३ | भा.द.वि. कलम ३६४,३२४, ३२३, ३५२, ४२७, ५०४, ५०६, ३४, महा. पो. ॲक्ट ३७(१) सह १३५. |

**३) आदित्य संतोष घायतडक वय २१ वर्षे रा.१५ नंबर बिल्डींग शेजारी बौध्द्नगर पिंपरी पुणे याचेवर दाखल गुन्हयाची माहीती.**

| अ.नं | पो.स्टे | गु.र.नं. | कलम |
|---|---|---|---|
| १ | पिंपरी | ६९६/२०२३ | भादविक ३७९ |